**महाराष्ट्र शासन**

**वन विभाग**

**संजय गांधी राष्ट्रीय उदयान, बोरीवली (पूर्व ) मुंबई - ४०००६६**

# जाहिराती विषयी अधिक माहिती

निसर्ग माहिती केंद्र, संजय गांधी राष्ट्रीय उदयान, बोरीवली येथे निसर्ग शिक्षण व विस्तार अधिकारी (Education & Extension Officer) यांची कंत्राटी पध्दतीन तात्पुरत्या स्वरुपात नेमणुक करणे प्रयोजित आहे. त्या करिता इच्छुक उमेदवार यांचे सीलबंद अर्ज वनसंरक्षक व संचालक, संजय गांधी राष्ट्रीय उदयान, बोरीवली यांचे नावे दिनांक २६/०२/२०२१ पासून ते ०७/०३/२०२१ पर्यंत कार्यालयीन वेळेत वनसंरक्षक व संचालक, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली मुंबई यांचे कार्यालयात स्विकारले जातील.

## A) कामाचे स्वरुप: -

१) नेचर ट्रेल/ ट्रेक साठी Naturalist (निसर्ग निर्वाचक) म्हणुन काम करणे.

२) निसर्ग माहिती केंद्र येथे आयोजित करावयाचे वर्षाचे Event Calender तयार करणे व त्याचे नियोजन करणे.

३) निसर्ग माहिती केंद्र मधील आयोजित करण्यात येणारे विविध Events इत्यादीचे आयोजन करणे व ते कार्यक्रम पार पाडणे.

४) शाळा महाविदयालये कॉर्पोरेट ऑफिसेस यांचेशी संपर्क साधून जास्तीत जास्त व्यक्तीना निसर्ग माहिती केंद्राच्या उपक्रमांमध्ये सामील करणे व निसर्ग माहिती केंद्राच्या महसुलात वाढ होण्यासाठी प्रयत्न करणे.

५) संजय गांधी राष्ट्रीय उदयानाची वेबसाईट, फेसबुक पेज इत्यादी अपडेट करणे व निसर्ग माहिती केंद्राचा ईमेल हाताळणे व इतर संबंधित विषय.

## B) पात्रता

१) अर्जदार विज्ञान शाखेचा मास्टर्स डिग्री धारक असावा. वनस्पती शास्त्र, प्राणीशास्त्र किंवा पर्यावरण शास्त्र या शाखेस प्राधान्य दिले जाईल.

२) अर्जदाराने निसर्ग निर्वाचक अथवा निसर्गप्रेमी संस्थेमध्ये काम केलेले असल्यास त्यास प्राधान्य दिले जाईल. अनुभवाचे प्रमाणपत्र सोबत सादर करावे.

३) संगणक हाताळण्याचे कौशल्य असावे.

४) राष्ट्रीय उदयानाबद्दल सखोल माहिती असावी.

५) संजय गांधी राष्ट्रीय उदयानामार्फत आयोजित विविध संशोधन, संवर्धनात्मक कार्यक्रमामध्ये व निसर्ग शिक्षण विषयक कार्यक्रमामध्ये सहभाग घेतला असल्यास त्यास प्राधान्य दिले जाईल

६) उत्कृष्ठ संभाषण कौशल्य असावे.

**C) मानधन :** महिन्याला रुपये २५,०००/- (रु. पंचवीस हजार) मानधन अदा करण्यात येईल.

**D ) मुलाखत :** अर्ज सादर केलेल्या उमेदवारांची मुलाखत मुख्य वनसंरक्षक व संचालक, संजय गांधी राष्ट्रीय उदयान बोरीवली यांचे कार्यालयात दिनांक ०८/०३/२०२१ रोजी ११.०० वा. निवड समिती मार्फत घेण्यात येईल. उमेदवारांची निवड मुख्यत्वे मुलाखतीच्या आधारावरच केली जाईल.

## E ) महत्वाची सुचना

१) कोणतेही कारण न देता नेमणुक नाकारण्याचा पुर्ण अधिकार निवड समितीकडे राहिल त्याबाबत दाद मागता येणार नाही.

२) एखादया अर्जदाऱ्याच्या बाबतीत निकष शिथील करण्याचा अधिकार निवड समिती अध्यक्षांचा राहील.

३) निसर्ग शिक्षण व विस्तार अधिकारी यांची निवड कंत्राटी पध्दतीने ११ महिने इतक्या कालावधीसाठी राहील. तथापि त्यांनी सदर कालावधीमध्ये उत्कृष्ठ काम केल्याचे त्यांच्या कामाच्या मुल्यमापनाअंती स्पष्ट झाल्यास त्यांना मुदतवाढ देशील मिळू शकेल.

सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**

**वनसंरक्षक व संचालक, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली (पूर्व) मुंबई यांचे कार्यालय**

Tel. 28860362 Email- sgnpmumbai@gmail.com

# संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली, मुंबई वनविभागासाठी कंत्राटी पध्दतीने निसर्ग शिक्षण व विस्तार अधिकारी यांच्या नियुक्ती करीता जाहिरात

निसर्ग माहिती केंद्र संयज गांधी राष्ट्रीय उद्यान बोरीवली येथे निसर्ग शिक्षण व विस्तार अधिकारी (Education & Extension Officer) यांची कंत्राटी पध्दतीने तात्पुरत्या स्वरुपात नेमणूक करणे प्रयोजित आहे. त्या करिता इच्छुक उमेदवार यांचे सीलबंद अर्ज वनसंरक्षक व संचालक, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली यांचे नावे दि. २६/०२/२०२१ पासून ते ०७/०३/२०२१ पर्यंत कार्यालयीन वेळेत वनसंरक्षक व संचालक, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली मुंबई यांचे कार्यालयात स्विकारले जातील.

| | |
|---|---|
| पद | निसर्ग शिक्षण व विस्तार अधिकारी (Education & Extension Officer) |
| पदसंख्या | ०२ |
| मानधन | रु. २५,०००/- दरमहा |
| पात्रता | १. अर्जदार विज्ञान शाखेचा मास्टर्स डिग्री धारक असावा, वनस्पती शास्त्र, प्राणी शास्त्र किंवा पर्यावरण शास्त्र या शाखेस प्राधान्य दिले जाईल.<br>२. राष्ट्रीय उद्यानाबद्दल व निसर्ग विषयक सखोल माहिती असावी.<br>३. उत्कृष्ट संभाष कौशल्य असावे.<br>४. संगणक हाताळण्याचे कौशल्य असावे.<br>५. सदर क्षेत्रातील अनुभवास प्राधान्य दिले जाईल. |
| मुलाखत | अर्ज सादर केलेल्या उमेदवारांची मुलाखत वनसंरक्षक व संचालक संजय गांधी राष्ट्रीय उद्यान बोरीवली यांचे कार्यालयात दि. ०८/०३/२०२१ रोजी ११.०० वा. समिती मार्फत घेण्यात येईल. |

टिप :- ही शासकीय नोकरी नसून केंवळ कंत्राटी पध्दतीवर ११ महिन्यांच्या करारावर नियुक्ती आहे. शैक्षणिक अर्हता, अनुभव, कर्तव्य, जबाबदारी, मानधन, नियुक्ती, कालावधी, बंधपत्र, अर्जाचा नमुना, निवडीची पध्दत इ. सविस्तर तपशिल www.mahaforest.gov.in व www.sgnp.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. तरी इच्छुक उमेदवारांनी सदर तपशिल पाहून अर्ज करावे. आवश्यक वाटल्यास या विभागाशी संपर्क साधावा.

सही/-
वनसंरक्षक व संचालक,
संजय गांधी राष्ट्रीय उद्यान,
बोरीवली